**1008** **CS (MAIN) EXAM, 2010**

**A-DTN-K-JM-13**

# MARATHI

**(Compulsory)**

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

***INSTRUCTIONS***

***Candidates should attempt ALL questions.***

***The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi (Devanagari Script) unless otherwise directed.***

***In the case of Question No. 3, marks will be deducted if the précis is much longer or shorter than the prescribed length.***

---

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर कमीतकमी 300 (तीनशे) शब्दात निबंध लिहा. *100*

(अ) कायदा 'मानरक्षण हत्या' थांबवू शकेल का ?

(ब) भेसळ खाद्यपदार्थांचा धोका

(क) अंधविश्वास आणि बुद्धिवाद

(ड) शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन

(इ) 'माहिती मिळवण्याचा अधिकार' अधिनियम स्वच्छ आणि न्यायपूर्ण शासन देऊ शकेल का ?

2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याच्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्पष्ट, योग्य आणि संक्षिप्त भाषेत लिहा. *10×6=60*

दिवसेंदिवस घटणाऱ्या आणि जास्तीत जास्त महाग होत जाणाऱ्या जळणाच्या पुरातन साधनांवरील आपली निर्भरता कमी होण्यासाठी सौर ऊर्जा, जो ऊर्जा नूतनीकरणाचा हिस्सा आहे, हा एकमेव मार्ग आहे. आपल्या ग्रहाचे पर्यावरणीय संतुलन आणि 'ग्रीनहाऊस' चा प्रभाव कमी करण्यासाठी सौर ऊर्जेचा उपयोग हा एकमात्र उपाय आहे. सौर ऊर्जा फायदेशीर असूनही ती अजून फारशी वापरली जात नाही आणि पुरातन जळणाला पर्याय म्हणून तिला फारशी मान्यताही मिळालेली नाही. हे कदाचित याची तांत्रिक किंमत तुलनात्मक दृष्ट्या जास्त असल्यामुळे असेल. तरीही दरवर्षी तंत्रज्ञानात होणाऱ्या युगप्रवर्तक सुधारणांमुळे किंमत कमी होऊन सावकाश का होईना पण खात्रीने हा एक पर्याय ठरत आहे. 'जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय ऊर्जा मिशन' हे सरकारने स्वच्छ व टिकाऊ उर्जेच्या दिशेने टाकलेले एक आदर्शवादी पाऊल आहे.

यामुळेच, सौर ऊर्जा क्षेत्र, रोजगार निर्मितीची आशा दाखविते. या क्षेत्रात संशोधन आणि तांत्रिकज्ञान यावर भर दिला जातो आणि रोजगार निर्माण होतो, अर्थातच मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित आणि विशेष नैपुण्य असलेली पदे निर्माण होतात.

भारताचा ऊर्जेच्या बाबतीत जगात जरी सहावा क्रमांक असला तरी आज भारतात उर्जेची प्रचंड कमतरता आहे. सौर ऊर्जेनेच हे संकट दूर होऊ शकेल. यामुळे पर्यावरणीय संतुलन साधले जाऊन सौर ऊर्जा निर्मितीची मागणी वाढेल. आज सर्वात जास्त मागणी असलेली पदे सौर ऊर्जा निर्मितीच्या यंत्रांची स्थापना व त्या यंत्रांची अभियांत्रिकी निर्मिती या क्षेत्रात आहेत. या उद्योगाच्या विकासासाठी सर्वात महत्त्वाचे हे आहे की कौशल्यांचा विकास करून, निर्मितीची किंमत कमी करून आणि व्यापाराच्या दृष्टीने किंमत संतुलित करून सौर ऊर्जेची किंमत खाली आणावी लागेल.

(i) आपल्याला जळणाच्या पुरातन साधनांवरील निर्भरता का कमी करावी लागेल ?

(ii) सौर ऊर्जेच्या उपयोगाचा फायदा काय ?

(iii) आजपर्यंत सौर ऊर्जेचा उपयोग लोकप्रिय का झाला नाही ?

(iv) सौर ऊर्जा सामान्य लोकांना परवडेल यासाठी काय प्रयत्न केले जात आहेत ?

(v) आपल्या तरूणपिढीला उच्च पातळीवरील नैपुण्यपूर्ण नोकऱ्या सौर ऊर्जा क्षेत्रामुळे कशा मिळू शकतील ?

(vi) सौर ऊर्जा कशाप्रकारे स्वस्त करता येईल ?

3. पुढील उताऱ्याचा सारांश त्यातील शब्दसंख्येच्या एक तृतीयांश शब्दसंख्येमध्ये लिहा. उताऱ्याला शीर्षक सुचविणे आवश्यक नाही. सारांश शब्दसंख्येच्या सीमेत नसेल तर तुमचे गुण कमी केले जातील. सारांश लिहिण्यासाठी दिलेल्या कागदांवरच सारांश लिहा व ते उत्तरपुस्तिकेच्या आत व्यवस्थित बांधा. *60*

जर कला ही प्रत्येक विशिष्ट युगाची अभिव्यक्ती असेल तर तिला गतकालाच्या सीमा तोडाव्याच लागतील आणि जुन्या कल्पनांच्या मर्यादा आणि मानसिकता झटकून टाकाव्या लागतील. जीवन एक वाहता प्रवाह आहे. त्याची गती क्रांतीच्या काळात जेव्हा बदल मूलभूत असतात आणि वेगाने होतात तेंव्हा वाढते. अशावेळी सामाजिक गरजा संस्कृतीच्या पुरोगामी प्रवृत्तींवर दबाव टाकतात — एक प्रकारे जुनी पाळेमुळे हलवून जुन्या प्रवृत्ती आणि नवीन सृजन यांच्यात द्वंद्व निर्माण करतात. प्राचीन संस्कृतीचे समर्थक परिवर्तनाच्या भीतीने जीव तोडून प्रयत्न करून आहे ती स्थिती टिकवण्याचा प्रयत्न करतात, ते स्वतः ला नैतिकमूल्यांचे आणि सभ्यतेचे संरक्षक असल्याचे घोषित करतात आणि येणाऱ्या प्रत्येक नव्या लाटेला थोपवण्याचा प्रयत्न करतात, तर बदलाचे समर्थक पुरातन मानदंड आणि नियम यांना झुगारून दिल्याशिवाय राहू शकत नाहीत. सामाजिक परिवर्तनाची प्रत्येक अवस्था अशा एका सांस्कृतिक रूपाची मागणी करते की जिच्याद्वारे स्वतःच्या सर्व गरजा ती अभिव्यक्त करू शकेल कारण गतयुगाने निर्माण केलेल्या गोष्टी नव्या शक्ती, नवे तंत्र यांचा वापर करू शकत नाहीत अथवा आपल्या परिधीत नव्या आदर्शांना प्रतिबिंबित करू शकत नाहीत. या संघर्षात जुन्या

संस्कृतीचे समर्थक असांस्कृतिक, काहीवेळा तर रानटी पद्धती, ज्यांची एके काळी स्वतः च त्यांनी उपेक्षा आणि निर्भत्सना केली होती, त्यांचा वापर करतात. कारण जेव्हा कुठलीही शक्ती प्रगतीशील राहू शकत नाही तेव्हा ती दडपशाही होते. नवा समाजच संस्कृती आणि विज्ञानाच्या प्रत्येक शाखेत कलाकाराच्या सर्वांगीण विकासाला वाव देऊ शकतो.

आज अव्यवस्थित समाजामुळे जीवनाचा एकसंघपणा तुटला आहे, जिथे प्रत्येक शाखेच्या हालचाली एकमेकापासून अलग झाल्या आहेत, तत्त्वज्ञ वैज्ञानिकापासून, कलाकार इंजिनयरापासून, जवळ जवळ प्रत्येकजणच अभिव्यक्त जीवनाच्या महान स्पंदनशील संजालापासून अलग झालेला आहे, जिथे खरं तर त्यापैकी प्रत्येकजण संतुलन, सौंदर्य आणि पूर्णाकृतीच्या रूपरेषांची महत्त्वपूर्ण कडी आहे. उदाहरणार्थ, आजच्या काळात यंत्रासारखं यंत्र देखील फक्त भूमितीच्या रेखाकृतींच्या चौकटीत बंदिस्त असलेलं, दूषित हवा आणि धूर निर्माण करणारं, जड आणि विकारहीन असं मानलं जात नाही तर ते अगदी साहजिकपणे खाली धरती आणि वर आकाश यांच्यासमवेत या देखाव्याचाच एक भाग म्हणून स्वीकारलं जातं आणि प्राचीन कथांमधील ऐतिहासिक कथनाचा भाग असल्यासारखं निपुण आणि शूरवीर असल्यासारखं जितंजागतं समजलं जातं. यंत्रं आज माणसाच्या अवयवांचा विस्तार झालेली आहेत. माणसानं निसर्गावर स्थापित केलेल्या वर्चस्वाचं ते प्रतिनिधित्व करतात, त्यानं निसर्गाच्या मूलतत्त्वांवर मिळवलेला विजय तें दाखवतात.

हा संघर्ष माणसाइतकाच पुरातन आहे. हा संघर्ष सौंदर्य, लय, संगीत आणि रंगांनी परिपूर्ण आहे.

जर माणसानं आपल्या कमकुवतपणानं यंत्राला आपल्यावर प्रभुत्व गाजवण्याची अनुमती दिली असेल तर त्यात यंत्राचा दोष नाही, जी माणसाची निर्मिती आहे, त्यानेच निर्माण करण्याची आणि विनाशही करण्याची ! दोष देण्याची भूक काहीवेळा माणसाचा कबजा घेते. रेडिओ फक्त माणसाच्या फुफ्फुसाचा विस्तार आहे तर टेलिफोन त्याच्या कानाचा ! विमाना कडे पाहून कपाळाला आठ्या घालणं आणि खडखडणाऱ्या बैलगाडीचं गुणगान करणं हा कुठल्या कवित्त्वाचा न्याय ? ही केवळ बुरसटलेली सांप्रदायिकता आहे. आज ट्रॅक्टर आहे तसाच नांगरही एकेकाळी युगप्रवर्तक शोध होता. नवीन उपकरणांचा शोध लावण्याच्या मानवाच्या अक्षय प्रतिभेची उपेक्षा करणं म्हणजे समाज परिवर्तनाच्या नियमांची उपेक्षा करणं आहे, आणि कुठलाही खरा कलाकार ते करणार नाही. प्रख्यात मेक्सिकोवासी कलाकार रिवेरा डियागो म्हणतात, "एक कलाकार जैविक कार्य म्हणून निर्मिती करतो जसं प्रत्येक झाड फुलं आणि फळं निर्माण करतं पण त्यांच्या दरवर्षी होणाऱ्या नाशाचं दुःख करत नाही. त्याला माहीत असतं की पुढच्या वर्षी त्याला पुनः बहर येईल आणि ते फळेलही. कलेनं फक्त जे आहे ते अभिव्यक्त न करता जे असू शकेल ते, न फक्त सामान्य आशाआकांक्षाच तर महत्त्वाकांक्षांचा अर्क, न फक्त हताश करणारे पराजय तर रूपांतर करू शकणाऱ्या संभावना, सगळंच अभिव्यक्त करायचं आहे.

4. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. *20*

The world does not need extraordinarily talented people. It does not need highly skilled people either. It has plenty of super-intelligent people. We need ordinary people with extraordinary motivation. M.K. Gandhi was an ordinary man with amazing motivation to establish truth and justice. The Wright brothers were ordinary people with a dream of flying.

You can also achieve exceptional results if you are inspired with a higher ideal. Replacing 'inspiration' with 'information' has led to knowledge being viewed as drudgery rather than as pleasure. Education has degenerated to data being transmitted from the teacher to the taught without igniting the minds of the young with a higher purpose.

How many of us wake up inspired, looking forward to a day of service ? Who among us finds exhilaration in contributing to society ? Life changes magically from boredom to excitement when you are inspired to serve. You redefine norms and achieve the impossible, paving the way to outstanding success. You find happiness at work, not in escaping from it. Most importantly, you evolve spiritually and attain Godhood.

Inspiration gives ordinary people the courage and hope to make life better for themselves and for posterity. Find inspiration and life will transform into an exciting adventure of self-discovery.

5. खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा. 20

आज विज्ञानाच्या सामाजिक जबाबदाऱ्यांबद्दल बोलताना मी अशा गोष्टींबद्दल बोलणार आहे की ज्या तुलनेने तरुणांना सोप्या वाटतील पण वयस्कांना अवघड वाटतील. कारण तरुणांजवळ एक असा गुण असतो जो सामान्यपणे वयाबरोबर कमी होतो. कल्पना करण्याचा गुण. कल्पना हा असा गुण आहे की जो विज्ञानाचा अंगभूत भाग आहे आणि तो निसर्गानं तरुणांना प्रदान केलेला आहे. दुःखाची गोष्ट ही आहे की हा गुण वाढत्या वयानुसार सुकून जातो, तरीही हा असा गुण आहे की आपल्या ह्या दुःखी जगाला ह्याची भरपूर प्रमाणात आवश्यकता आहे.

मागच्या तीन शतकांपासून विज्ञानाच्या शोधांनी समाजावर आपला प्रभाव टाकला आहे पण सामान्यपणे लोकांना हे समजलेलं नाही आणि हे जाणून घेण्याचा कुणी प्रयत्नही केलेला नाही. न्यूटनच्या काळापासून मानवाला याची जाणीव झाली की तंत्रज्ञानातून, जे विज्ञानाच्या शोधांवर आधारलेले आहे, भरपूर आराम आणि फायदे मिळू शकतात. नंतर जनसामान्यांना जाणीव होऊ लागली की विज्ञानाचा प्रयोग करून बनवलेल्या औषधांमुळे तो जास्त जगू शकतो.

लिओनार्डो द व्हिन्सी यांच्या काळापासून लोकांना याचं कौतुक होतं की विज्ञान युद्धे जिंकण्यासाठी भौतिकदृष्ट्या मदत करू शकते. कालानुक्रमाने, औद्योगिक भौतिकवाद विकसित झाला; नव्या तंत्रज्ञानाची मागणी अधिकाधिक वाढू लागली; जास्तीत जास्त लोक वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ बनू लागले.

6. (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***पाच*** वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 5

(i) नाकापेक्षा मोती जड

(ii) आडात नसेल तर पोहऱ्यात कुठून येईल ?

(iii) आपल्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही पण दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ दिसतं.

(iv) कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच

(v) हात दाखवून अवलक्षण

(vi) आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचं ते कार्ट

(vii) कुंपणच शेत खायला लागलं तर काय करणार ?

(viii) आयत्या बिळावर नागोबा

(आ) पुढीलपैकी ***एका*** विषयावर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी 20 वाक्यांच्या मर्यादेत पत्र लिहा. 5

(i) पावसाळ्यातील रोगराईचा प्रतिबंध

(ii) रस्तारुंदीसाठी चाललेल्या खोदकामामुळे होणारी अडचण

(iii) कॉमनवेल्थ गेमस

(इ) पुढीलपैकी कुठल्याही ***एका*** कल्पनेचा विस्तार 15 वाक्यात करा. 10

(i) ठेविले अनंते तैसेचि रहावे
चित्ती असू द्यावे समाधान

(ii) दिसामाजी काहीतरी ते लिहावे

(iii) सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता एवढे

(ई) पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर 15 वाक्यांचा संवाद लिहा. *10*

(i) प्राथमिक शाळेत शिक्षणाचे माध्यम

(ii) धर्मनिरपेक्षता

(iii) मराठीचे अस्तित्त्व धोक्यात आहे का ?

(उ) पुढील कवितेचे 15 वाक्यात रसग्रहण करा. *10*

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुशीसनी गेलं कुंकू
रेखा उघडी पडली

देवा, तुझ्याबी घरचा
झरा धनाचा आटला
धन-रेखाच्या चन्यानं
तयहात रे फाटला

बापा, नको मारू थापा
असो खऱ्या असो खोटया
नही नशीब नशीब
तयहाताच्या रेघोटया

अरे, नशीब नशीब
लागे चक्कर पायाले
नशिबाचे नऊ गिऱ्हे
ते बी फिरत राह्यले

नको नको रे जोतिषा,
नको हात माझा पाहू
माझं दैव माले कये
माझ्या दारी नको येऊ !